**रे.दि.मू.नं. ७१/२०१६ मधील नि. २१ खालील आदेश**
**( बाजीराव शेडगे विरूध्द धोंडिबा शेडगे )**
**(आदेश पारीत दि. ०४/०८/२०१७)**

सदरचा अर्ज वादीने यातील प्रतिवादी धोंडिबा राजाराम शेडगे हे दि. २७/०६/२०१७ रोजी मयत असून त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस व त्यांचे नावापुढे मयत असे लिहणेस परवानगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जास प्रतिवादीने म्हणणे दाखल केले. प्रतिवादीने असे कथन केले की सदर अर्जामध्ये नमूद केलेली कारणे योग्य नाहीत, सबब सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा.

३. दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला, सदरचा दावा हा ठरावासाठी व निरंतर ताकीद मिळणेकरिता दाखल केला. वादी मागणी करत असलेल्या दुरूस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरूपात कोणताही बदल होत नाही. सदर दाव्यातील वादी व प्रतिवादी यांचेमधील वाद संपुष्टात आणणेकरिता प्रतिवादी धोंडिबा राजाराम शेडगे यांचे वारस रेकॉर्डवर घेणेचा आदेश पारीत करणे तसेच त्यांचे नावापुढे मयत असे लिहणेस व त्याप्रमाणे दुरूस्ती करणेस परवानगी देणे गरजेचे वाटते. सबब मी खालील आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. नि. २१ चा अर्ज मंजूर करणेत येतो.

२. वादी यांनी प्रतिवादी धोंडिबा राजाराम शेडगे चे वारस मुदतीत रेकॉर्डवर घ्यावेत व त्याप्रमाणे सरनाम्यात मुदतीत दुरूस्ती करावी.

३. सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी.

**दि. ०४/०८/२०१७**

**(डी.एम.गिरी)**
**सह.दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**
**खंडाळा.**